निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
गुरुवार
२६ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३६० वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# औषधी वनस्पतींचे संवर्धन ही लोकचळवळ व्हावी: राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**आत्ताच एक्सप्रेस**

**शेगाव (प्रतिनिधी)**आयुर्वेद व योगशास्त्र ही भारतीय ज्ञान परंपरा जगाला 'स्वस्थ भविष्या'ची ग्वाही देणारी आहे. केवळ शासन किंवा प्रशासनावर अवलंबून न राहता, औषधी वनस्पतींचे संवर्धन ही एक लोकचळवळ झाली पाहिजे, असे प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज येथे केले.केंद्र शासनाचे आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने शेगाव येथील विसावा भक्तनिवास संकुल परिसरात आयोजित राष्ट्रीय आरोग्य मेळाव्याचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते झाले. याप्रवेळी त्या बोलत होत्या.या सोहळ्याला राज्यपाल आचार्य देवव्रत, केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, युवा कार्यक्रम व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर, बुलडाण्याचे पालकमंत्री मकरंद जाधव पाटील यांच्यासह आयुर्वेद क्षेत्रातील दिग्गज आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.आपल्या संस्कृतीने शरीर हे सर्व कर्तव्ये पूर्ण करण्याचे साधन मानले आहे. देशाला सशक्त करण्यासाठी नागरिकांचे आरोग्य पूर्ण असणे अनिवार्य आहे.

योग आणि आयुर्वेद केवळ उपचार पद्धती नसून ती मन आणि शरीराचे संतुलन साधणारी जीवनशैली आहे.आयुष मंत्रालयातर्फे औषध परीक्षण प्रयोगशाळा आणि वैश्विक पारंपरिक चिकित्सा केंद्रांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली जात आहेत.

राज्यपाल आचार्य देवव्रत: त्यांनी आहारपद्धतीतील बदलांवर चिंता व्यक्त केली. पारंपरिक वनस्पतींचा आहारात वापर केल्यास आजारपण दूर ठेवता येते, असे त्यांनी नमूद केले.केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव: जग आज 'वेलनेस'कडे




वळत असून भारत या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करेल. महाराष्ट्रात स्वतंत्र आयुष मंत्रालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे त्यांनी सांगितले.हा मेळावा केवळ औपचारिक नसून नागरिकांसाठी ज्ञानाची आणि उपचारांची मोठी पर्वणी ठरत आहे.

आरोग्य तपासणी-प्रख्यात तज्ज्ञ डॉक्टरांद्वारे विनामूल्य तपासणी व आयुष औषधोपचार.**प्रदर्शनी-** दुर्मिळ वनौषधींचे प्रदर्शन (डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, नागार्जुन उद्यान).**विशेष कक्ष-**औषध कंपन्या, संशोधन केंद्रे आणि महाविद्यालयांचे माहितीपर स्टॉल्स.**प्रशिक्षण-**घरगुती आयुर्वेदिक प्रथमोपचार (आजीबाईंचा बटवा) प्रशिक्षण.२६ फेब्रुवारी: शेतकरी बांधवांसाठी वनौषधी लागवड, प्रक्रिया व विपणन यावर विशेष कार्यशाळा (दुपारी ३ वा.).२७ फेब्रुवारी: दिव्यांग व्यक्तींसाठी 'वयोश्री' व ADIP तपासणी आणि साहित्य वाटप शिबिर.२८ फेब्रुवारी: मोफत नेत्रतपासणी, चष्मे वाटप आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया नोंदणी शिबिर.या सोहळ्यात आयुर्वेद क्षेत्रातील ज्येष्ठ वैद्यांचा गौरव करण्यात आला. तसेच, गिनीज बुक ऑफ रेकॉर्डतर्फे आयुष मंत्रालयाला मिळालेले प्रमाणपत्र राष्ट्रपतींना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आले.

## संक्षिप्त

### धक्कादायक! काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावर पुण्यात जीवघेणा हल्ला



**भोकरदनमध्ये संतापाची लाट, जनआंदोलनाचा इशारा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन/प्रतिनिधी/**महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रवक्ते श्री. हनुमंतजी पवार यांच्यावर पुण्यात झालेल्या भ्याड आणि जीवघेण्या हल्ल्याचे पडसाद आता ग्रामीण भागातही तीव्रतेने उमटू लागले आहेत. या घटनेच्या निषेधार्थ आज भोकरदन तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना अत्यंत आक्रमक भाषेत निवेदन सादर करण्यात आले. **'दोषींवर कठोर कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडू'**, असा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, श्री. हनुमंत पवार यांना पुण्यातील एका खाजगी वृत्तवाहिनीने चर्चेसाठी आमंत्रित केले होते. या चर्चे दरम्यान भाजपच्या कार्यकर्त्यांशी त्यांचा शाब्दिक वाद झाला. मात्र, हा वाद वैचारिक स्तरावर न राहता त्याचे पर्यावसान हिंसेत झाले. चर्चेनंतर बाहेर पडताच भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी पवार यांना पिस्तुल दाखवून त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला आणि त्यांना बेदम मारहाण केली.

**पोलीस प्रशासनावर संताप; 'अर्थपूर्ण' दुर्लक्षाचा आरोप**

या घटनेत सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पुणे पोलिसांनी दाखवलेली भूमिका. निवेदनात नमूद केल्यानुसार, एवढ्या गंभीर स्वरूपाचा हल्ला होऊनही पुणे पोलिसांनी हल्लेखोरांवर कोणतीही ठोस कायदेशीर कारवाई केली नाही. उलट, केवळ समज देऊन त्यांना सोडून देण्यात आले. पोलिसांच्या या 'मवाळ' भूमिकेचा काँग्रेसने जाहीर निषेध केला असून, सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली पोलीस गुन्हेगारांना पाठीशी घालत आहेत का? असा जळजळीत सवाल उपस्थित केला जात आहे.

**भोकरदन तालुका काँग्रेस आक्रमक**

तालुका अध्यक्ष त्र्यंबक बंडूजी पाबळे यांच्या नेतृत्वाखाली आज कार्यकर्त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. निवेदनात खालील प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत:

गृहमंत्री महोदयांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन तत्काळ हस्तक्षेप करावा.

हल्लेखोरांवर आणि त्यांना पाठीशी घालणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी.

जर तात्काळ पावले उचलली गेली नाहीत, तर संपूर्ण तालुक्यात जनआंदोलन उभे केले जाईल.

यावेळी निवेदनावर त्र्यंबक पाबळे यांच्यासह इरफान शेख, जहीर खान, एस. सत्तार, रतन डभाडे, राजान अहमद खान पठाण, दादाराव देशमुख आणि मजहर समद कादरी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या घटनेमुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, आता सरकार यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मराठवाड्यात अवकाळीचा हाहाकार

## २५ हजार हेक्टरवरील पिके मातीमोल, बळीराजा पुन्हा संकटात

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** गेल्या दोन दिवसांपासून मराठवाड्यात झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीने रब्बी हंगामातील पिकांचे अक्षरशः कंबरडे मोडले आहे. प्राथमिक अंदाजानुसार, मराठवाड्यातील तीन प्रमुख जिल्ह्यांत तब्बल २५ हजार हेक्टरहून अधिक क्षेत्रावरील पिके उद्ध्वस्त झाली आहेत. ऑगस्ट-सप्टेंबरमधील अतिवृष्टीच्या जखमा भरत असतानाच, आता पुन्हा अवकाळीने वार केल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे.




**नुकसानीचा जिल्ह्यानुसार आढावा**

कृषी विभागाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, लातूर, परभणी आणि बीड जिल्ह्यांत सर्वाधिक फटका बसला आहे.

| जिल्हा | बाधित क्षेत्र (अंदाजे हेक्टरमध्ये) | मुख्य बाधित पिके |
|---|---|---|
| लातूर | १५,००० ते १५,११९ | गहू, ज्वारी, हरभरा, द्राक्ष |
| परभणी | ४,९०० ते ५,००० | मका, गहू, फळबागा |
| बीड | ३,४०० ते ३,४०९ | कलिंगड, टरबूज, ज्वारी |

**अधिवेशनात घुमले नुकसानीचे पडसाद**

राज्यात सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातही या नुकसानीचे तीव्र पडसाद उमटले. भाजपा आमदार अभिमन्यू पवार यांनी हा प्रश्न लावून धरत तात्काळ पंचनामे करण्याची मागणी केली. यावर उत्तर देताना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यातील सर्व नुकसानग्रस्त पिकांचे तातडीने सर्वेक्षण करून मदत देण्याचे आश्वासन दिले आहे.

**प्रमुख मागण्या आणि सद्यस्थिती**

**१. तात्काळ पंचनामे:** प्रशासनाने कागदी घोडे न नाचवता प्रत्यक्ष बांधावर जाऊन पंचनामे करावेत.

**२. नुकसान भरपाई:** खरीपाच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत मिळावी.

**३. बी-बियाणे पुरवठा:** आगामी हंगामासाठी सवलतीच्या दरात बियाणे उपलब्ध करून द्यावे.

**थोडक्यात:** निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसलेला शेतकरी आता सरकारच्या मदतीकडे डोळे लावून बसला आहे. प्रशासकीय हालचाली किती वेगाने होतात, यावरच मराठवाड्यातील शेतकऱ्याचे भवितव्य अवलंबून आहे.

**शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी: हृदयद्रावक कहाणी**


अवकाळीचा फटका केवळ पिकांनाच नाही, तर शेतकऱ्यांच्या स्वप्नांनाही बसला आहे. लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील कारला येथील शेतकरी **रंगराव काळे** यांची व्यथा ऐकून अंगावर काटा येतो. पेरणीसाठी पैसे नसल्याने त्यांनी आपल्या पत्नीचे **कानले विकून** शेतीची मशागत केली होती. मात्र, निसर्गाच्या कोपाने उभे पीक आडवे झाले. आता मुलांचे शिक्षण आणि पुढच्या खरीपाची पेरणी कशी करायची, या चिंतेने त्यांना ग्रासले आहे.

# सत्तेच्या ऊबेत 'साहेबांच्या' मुलाचे नशीब फळफळले!

## २५ लाखांचे भांडवल, अनुभव शून्य; तरीही ४,७०० कोटींचे सौर कंत्राट खिशात!

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या एका धक्कादायक कराराची जोरदार चर्चा सुरू आहे. ज्या कंपनीकडे ना कामाचा दांडगा अनुभव आहे, ना मोठे भांडवल, अशा एका नवख्या कंपनीवर राज्य सरकारने तब्बल ४ हजार ७०० कोटी रुपयांच्या सौर ऊर्जा प्रकल्पाची मेहेरबानी केली आहे. विशेष म्हणजे, ही कंपनी माजी केंद्रीय मंत्री भागवत कराड यांचा मुलगा वरुण कराड यांची असल्याची खळबळजनक माहिती समोर आली आहे.



**अनुभव शून्य, पण नशीब जोरावर!**

मिळालेल्या माहितीनुसार, 'एलएनके ग्रीन' (LNK Green) असे या कंपनीचे नाव असून तिची स्थापना अवघ्या एका वर्षापूर्वी झाली आहे. धक्कादायक बाब म्हणजे या कंपनीचे एकूण अधिकृत भांडवल केवळ २५ लाख रुपये आहे. सौर ऊर्जा क्षेत्रातील कोणताही दीर्घ अनुभव नसताना, इतक्या मोठ्या रकमेचे कंत्राट या कंपनीला कसे मिळाले? हा आता यक्षप्रश्न बनला आहे.

**दावोस दौऱ्यात 'नशीब' उघडले**

नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्र्यांच्या दावोस (स्वित्झर्लंड) दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र सरकारने अनेक सामंजस्य करार (MoUs) केले. यातच या एलएनके ग्रीन कंपनीसोबतचा करारही करण्यात आला. एका बाजूला राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुण नोकरीसाठी वणवण फिरत असताना, दुसरीकडे सत्ताधाऱ्यांच्या नातेवाईकांच्या कंपन्यांना हजारो कोटींच्या कामांची खिरापत वाटली जात असल्याचा आरोप आता होऊ लागला आहे.

**जयश्री खाडिलकर यांचा खळबळजनक दावा**

संपादिका जयश्री खाडिलकर यांनी या प्रकरणाचा पर्दाफाश करताना गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या दाव्यानुसार...

-भागवत कराड हे केंद्रात मंत्री असताना ऊर्जा मंत्रालयाशी संबंधित विविध समित्यांवर होते.

-...त्या अभ्यासाचा फायदा घेत मुलाच्या कंपनीला हे कंत्राट मिळवून देण्यात आले.



**स्वत:** कराड यांनीच माझ्या मुलामुळे हे कंत्राट महाराष्ट्राला मिळाले, अन्यथा ते गुजरातला गेले असते असे विधान केल्याचेही सांगितले जात आहे.

जनतेचे प्रश्न आणि सरकारचे मौन

१. ज्या कंपनीकडे मोठे प्रकल्प राबवण्याचा कोणताही ट्रॅक रेकॉर्ड नाही, तिला ४,७०० कोटींचा विश्वास कसा काय दिला जातो?

२. केवळ राजकीय संबंधांनुसार ही कंत्राटे वाटली जात आहेत का?

३. २५ लाखांचे भांडवल असलेली कंपनी ४,७०० कोटींचा प्रकल्प कसा काय पेलणार?

हा प्रकार म्हणजे **'दुभत्या गाईचा पाय'** आपल्याच घरी बांधण्याचा प्रकार आहे. सामान्य कंत्राटदाराला साध्या कामासाठी शेकडो कागदपत्रे आणि अनुभवाची अट घातली जाते, मात्र मंत्र्यांच्या पुत्रासाठी नियमांची पायमल्ली झाली आहे का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडून संत गजानन महाराजांच्या समाधीचे दर्शन



**आत्ताच एक्सप्रेस**

**बुलढाणा /प्रतिनिधी/** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज विदर्भ दौऱ्यावर असून, त्यांनी बुलढाणा जिल्ह्यातील श्रीक्षेत्र शेगाव येथे भेट दिली. महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि 'गण गण गणात बोते' असा मंत्र देणारे संत श्री गजानन महाराज यांच्या समाधीचे त्यांनी मनोभावे दर्शन घेतले.राष्ट्रपतींचे शेगाव येथे आगमन होताच संत गजानन महाराज संस्थानच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. भारतीय परंपरेनुसार, सुवासिनींनी त्यांचे औक्षण केले. यावेळी संस्थानचे विश्वस्त निळकंठ शिवशंकर पाटील आणि हरिहर निळकंठ पाटील यांनी त्यांचे स्वागत करून संस्थानच्या कार्याची माहिती दिली.समाधी मंदिरात दर्शन घेतल्यानंतर राष्ट्रपतींनी काही वेळ तेथे ध्यानस्थ होऊन प्रार्थना केली. त्यानंतर त्यांनी मंदिर परिसराची पाहणी केली. शेगाव संस्थानच्या वतीने राबवले जाणारे सामाजिक उपक्रम, स्वच्छता आणि तेथील शिस्तबद्ध नियोजनाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.राष्ट्रपतींच्या या दौऱ्यामुळे शेगाव परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे.

## महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पस प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात विधानभवन येथे सामंजस्य करार करण्यात आला.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या सामंजस्य कराराच्यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या कुलगुरू व अध्यक्षा प्रा.एव्हलिन वेल्च, ब्रिस्टॉल विद्यापीठाच्या मुख्य संचालन अधिकारी लुसिंडा पार, संचालक ज्युलिया हॉल, मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विन दामेरा आदी उपस्थित होते.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ब्रिस्टॉल विद्यापीठासारख्या जागतिक कीर्तीच्या संस्थेसोबत करार होणे ही अभिमानाची बाब आहे. या सहकार्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आणि त्यासाठी सक्षम असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

शासन आणि अकॅडेमिया एकत्र आले तर आपण नक्कीच उज्ज्वल भविष्य निर्माण करू शकतो, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण

या करारानुसार 'मुख्यमंत्री व ब्रिस्टॉल विद्यापीठ शिष्यवृत्ती योजना' संयुक्तपणे विकसित व राबविण्यात येणार आहे. सामाजिक व आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च प्रतीचे शिक्षण मिळावे, हा या योजनेमागील प्रमुख उद्देश आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संपूर्ण कालावधीसाठी १०० टक्के शिक्षण शुल्क माफ करण्यात येईल. या शिष्यवृत्तीचा संपूर्ण खर्च ब्रिस्टॉल विद्यापीठ मुंबई कॅम्पसकडून उचलण्यात येणार आहे.

## परतूर नगर परिषदेत 'दांडीबहाद्दर' अधिकाऱ्यांचा सुळसुळाट; विरोधी पक्षनेते गणेश नळगे आक्रमक!

**मुख्यधिकाऱ्यांच्या दालनातच घातला जाब; कामचुकार अधिकाऱ्यांना 'कारण दाखवा' नोटिसा बजावण्याची मागणी**

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतूर (प्रतिनिधी)**

परतूर नगर परिषदेच्या प्रशासकीय कारभाराचा बोजवारा उडाला असून, लोकप्रतिनिधींच्या बैठकीलाच वाटाण्याच्या अक्षता लावणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यांविरोधात आता रणशिंग फुकले गेले आहे. नगर परिषदेच्या सर्वसाधारण बैठकीत महत्त्वाच्या विभागाचे अधिकारी गायब राहिल्याने, संतप्त झालेले विरोधी पक्षनेते तथा गटनेते गणेश नाना नळगे यांनी थेट मुख्यधिकाऱ्यांचे दालन गाठून प्रशासनाला धारेवर धरले. हे प्रशासन आहे की खासगी दुकान? असा संतप्त सवाल करत त्यांनी लेखी निवेदनाद्वारे आपला संताप व्यक्त केला.

मिळालेल्या माहितीनुसार, नगर परिषदेची महत्त्वाची सर्वसाधारण बैठक आयोजित करण्यात आली होती. शहराच्या विकासाचे प्रश्न, नागरी सुविधा आणि प्रलंबित कामांवर चर्चा करण्यासाठी सर्व नगरसेवक उपस्थित होते. मात्र, ज्यांच्याकडे प्रश्नांची उत्तरे द्यायची जबाबदारी आहे, ते संबंधित विभागाचे अधिकारीच बैठकीतून गायब असल्याचे निदर्शनास आले. बैठकीची पूर्वसूचना देऊनही अधिकाऱ्यांनी दांडी मारल्याने शहराच्या विकासकामांचा खोळंबा झाला आणि बैठकीत प्रचंड गोंधळ निर्माण झाला.

लोकप्रतिनिधींचा अवमान सहन करणार नाही - गणेश नळगे

या प्रकारावर कडाडून टीका करताना गणेश नळगे म्हणाले की, अधिकारी बैठकीला उपस्थित न राहणे हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून, जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींचा घोर अपमान आहे. प्रशासनातील शिस्त पूर्णपणे ढासळली असून, अधिकाऱ्यांना कोणाचाही वचक राहिलेला नाही.

> सामान्य जनतेच्या टॅक्समधून पगार घेणारे अधिकारी जर जनतेच्या प्रश्नांसाठी वेळ देऊ शकत नसतील, तर अशा कामचुकार अधिकाऱ्यांना खुर्चीवर बसण्याचा अधिकार नाही. शिस्त मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे!
>
> **- गणेश नाना नळगे (विरोधी पक्षनेते, नगर परिषद परतूर)**

**पुढील वृत्त पान २ वर..**

# माधव भंडारी आणि भाजपची निष्ठा: संधी की पुन्हा प्रतीक्षा?

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या राज्यसभेच्या सात जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीचे वारे जोरात वाहत आहेत. विशेषतः भारतीय जनता पक्षाच्या गोटात उमेदवारांच्या निवडीसाठी सुरू असलेली खलबतं आणि त्यात चर्चेत आलेली माधव भंडारी यांची नावे, हा राजकीय विश्लेषकांसाठी नेहमीच औत्सुक्याचा विषय ठरला आहे. यंदाच्या निवडणुकीत भाजपच्या वाट्याला येणाऱ्या जागा आणि इच्छुकांची लांबलचक रांग पाहता, **'निष्ठावंतांना न्याय'** मिळणार का, हा कळीचा प्रश्न आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' निवासस्थानी पार पडलेली कोअर कमिटीची बैठक ही केवळ नावांची चर्चा नव्हती, तर ती पक्षांतर्गत समीकरणांची जुळवाजुळव होती. भाजपने दिल्लीला पाठवण्यासाठी २५ जणांची यादी तयार केली आहे. यात विनोद तावडे, रावसाहेब दानवे यांसारख्या वजनदार नेत्यांपासून ते डॉ. भागवत कराड यांच्यासारख्या अनुभवी चेहऱ्यांचा समावेश आहे. मात्र, या गर्दीत पुन्हा एकदा माधव भंडारी यांचे नाव चर्चेत आले आहे. भंडारी यांनी अनेक दशकांपासून पक्षाची बाजू समर्थपणे मांडली आहे, तरीही 'वेटिंग लिस्ट' संपण्याचं नाव घेत नाहीये.

महायुतीचे संख्याबळ आणि राजकीय गणित

राज्यसभेचे गणित पूर्णतः विधानसभेतील संख्याबळावर अवलंबून असते. यंदाच्या आकडेवारीनुसार:

भाजपकडे स्वतःची १३६ मते असून तीन जागा सहज निवडून येऊ शकतात.रामदास आठवले यांची उमेदवारी जवळपास निश्चित मानली जात असल्याने उर्वरित जागांवर कोणाची वर्णी लागेल, याकडे सर्वांचे लक्ष आहे.महायुतीकडे असलेली अतिरिक्त मते पाहता, सहावी जागा निवडून आणणे सोपे आहे, मात्र सातव्या जागेसाठी मोठी कसरत करावी लागणार आहे.

अपेक्षित बदल की परंपरेची पुनरावृत्ती?

भाजप नेहमीच 'सरप्राईज कार्ड' खेळण्यासाठी ओळखला जातो. एकीकडे रावसाहेब दानवे, भारती पवार यांसारख्या पराभूत नेत्यांचे पुनर्वसन करण्याचे आव्हान पक्षासमोर आहे, तर दुसरीकडे विजया रहाटकर आणि माधव भंडारी यांच्यासारख्या संघटननिष्ठ कार्यकर्त्यांची अपेक्षा आहे.

जर पक्षाने केवळ निवडून येण्याची क्षमता (एश्रशलींरलळश्रळींू) पाहिली तर पुन्हा एकदा प्रस्थापित नेत्यांना संधी मिळेल, पण जर 'निष्ठा' हा निकष लावला तर माधव भंडारी यांच्यासाठी ही शेवटची आणि महत्त्वाची संधी ठरू शकते.

राज्यसभा निवडणूक ही केवळ संख्याबळाची लढाई नसून ती पक्षाच्या भविष्यातील रणनीतीची नांदी आहे.

२५ जणांच्या यादीतून दिल्लीतील हायकमांड कोणाच्या नावावर शिक्कामोर्तब करते, यावर भाजपमधील 'निष्ठा' आणि 'संधी' यांचे समीकरण स्पष्ट होईल.

# महापालिकेचा 'साप्ताहिकां'वर अन्याय; ६ महिन्यांपासून जाहिरातींचा वनवास!

## कारणे सांगा, नाहीतर खुर्च्या खाली करा; अब्दुल कय्यूम यांचा थेट इशारा । 'व्हॉईस ऑफ मीडिया'चा रणशिंग!

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या अनाकलनीय आणि मनमानी कारभारामुळे स्थानिक साप्ताहिक वृत्तपत्रांची गळचेपी सुरू असून, गेल्या सहा महिन्यांपासून जाहिरातींचे वाटप अचानक बंद करण्यात आले आहे.

अचानक जाहिराती का बंद केल्या? याचे उत्तर प्रशासनाला द्यावेच लागेल, अशा शब्दांत 'व्हॉईस ऑफ मीडिया'चे प्रदेशाध्यक्ष अब्दुल कय्यूम यांनी प्रशासनावर तोफ डागली आहे. या संदर्भात आज विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर आणि मनपा आयुक्तांच्या पी.ए. यांना निवेदनाद्वारे जाब विचारण्यात आला.

प्रशासनाचा **'अर्थपूर्ण'** शांतपणा?

ऑगस्ट-सप्टेंबर २०२५ पासून महापालिकेने साप्ताहिक वृत्तपत्रांकडे पूर्णपणे पाठ फिरवली आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता किंवा अधिकृत कारण न सांगता जाहिरातींची रसद तोडण्यात आली आहे. यामुळे शेकडो पत्रकार आणि वृत्तपत्र कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. साप्ताहिके ही तळागाळातील सामान्य जनतेचा आवाज आहेत, पण प्रशासनाला हा आवाज दाबायचा आहे का? असा संतप्त सवाल पत्रकार वर्तुळातून विचारला जात आहे.

विरोधी पक्षनेत्यांकडे गाऱ्हाणे; प्रशासनाची चौकशी होणार!

साप्ताहिकांच्या या आर्थिक कोंडीची दखल घेत विरोधी पक्षनेते समीर साजिद बिल्डर यांनी प्रशासनाला धारेवर धरण्याचे आश्वासन दिले आहे.

त्यांनी स्पष्ट केले की, जाहिराती बंद करण्यामागे कोणाचे हितसंबंध गुंतले आहेत, याची सखोल चौकशी केली जाईल आणि साप्ताहिकांना त्यांचा हक्क मिळेपर्यंत पाठपुरावा सुरू राहील.

अब्दुल कय्यूम यांचा आक्रमक पवित्रा

निवेदन दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना अब्दुल कय्यूम म्हणाले:

सहा महिन्यांपासून जाहिराती थांबवून साप्ताहिकांचा गळा घोटण्याचे काम महापालिका करत आहे. प्रशासनाने जाहिरात वितरणात पारदर्शकता पाळली नाही तर येणाऱ्या काळात आंदोलन अधिक तीव्र होईल.




जाहिरात वितरण हे कोणाची मेहेरबानी नसून तो वृत्तपत्रांचा हक्क आहे. आम्हाला स्पष्टीकरण हवे आहे - जाहिराती नेमक्या कोणाच्या सांगण्यावरून बंद झाल्या?यावेळी आक्रमक भूमिकेत सैय्यद करीम, शेख इसाकोद्दीन, रमेश जाबा, मिर्झा शफीक बेग, हसन शाह, सैय्यद शब्बीर यांच्यासह अनेक ज्येष्ठ पत्रकार उपस्थित होते. मनपा आयुक्तांपर्यंत ही मागणी पोहोचवण्यात आली असून, आता चेंडू प्रशासनाच्या दरबारी आहे.

**मुख्य मागण्या:**

सप्टेंबर २०२५ पासून प्रलंबित असलेल्या सर्व जाहिराती तात्काळ रिलीज करा.

जाहिरात वितरणात 'समतोल आणि न्याय्य' धोरण राबवा.

जाणीवपूर्वक साप्ताहिकांना डावलणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करा.

# सोयगाव जिल्हा परिषद प्रशालेचा ऐतिहासिक डंका: NMMS परीक्षेत १२ विद्यार्थ्यांचे घवघवीत यश!

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव (प्रतिनिधी)** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला योग्य दिशा मिळाल्यास ते राष्ट्रीय स्तरावरही आपली मोहोर उमटवू शकतात, याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशालेने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत (NMMS) दैदीप्यमान कामगिरी केली असून, शाळेच्या इतिहासात प्रथमच १२ विद्यार्थी या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

या कठीण परीक्षेत यशस्वी होऊन प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

वैष्णवी कडुबा ढगे, देवयानी गोपाल औटे, नेहा शिवदास आस्वार,अक्षरा परशुराम पंडित,पलक भागवत गायकवाड, देवयानी निलेश मिसाळ, तेजस समाधान भोकरे, गायत्री भगवान बावस्कर, पूजा शिवाजी बावस्कर, प्रांजली राजेंद्र खलसे, वृषाली गोपाल साळुंखे, पार्थ समाधान इंगळे या विद्यार्थ्यांव्यतिरिक्त काही विद्यार्थी अगदी थोड्या गुणांनी अपात्र ठरले, मात्र त्यांच्या जिद्दीचे आणि प्रयत्नांचेही सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांचा गौरव व सत्कार

या अभूतपूर्व यशाची दखल घेत गटशिक्षणाधिकारी कार्यालय सोयगावच्या वतीने सोयगाव केंद्राचे केंद्रप्रमुख माननीय फिरोज तडवी यांनी प्रशालेला भेट दिली. त्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

केवळ विद्यार्थीच नव्हे, तर त्यांना घडवणारे मार्गदर्शक शिक्षक भास्कर चौधरी, श्रीमती संगीता सोनवणे, माजी शिक्षक पंकज रगडे आणि निदेशक सचिन ढगे यांचाही केंद्रप्रमुखांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

या यशामागे गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे, विस्तार अधिकारी सचिन पाटील, केंद्रप्रमुख फिरोज तडवी आणि मुख्याध्यापक दादाराव राठोड यांचे खंबीर नेतृत्व लाभले. तसेच प्रशालेतील शिक्षक:

सुकदेव पाटील, शिवाजी नवले, दौलतसिंग परदेशी, राजेंद्र उंबरकर, जया वाघ, तुकाराम




पायाघन, विद्याधर बागुल, वैजनाथ सावळे, संतोष भारद्वाज, शिवराम आगे आणि सीमा राऊत या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सांघिक परिश्रमामुळेच सोयगाव प्रशालेने हे यश संपादन केले आहे.

सध्या सोयगाव परिसरात या गुणवंत विद्यार्थ्यांवर आणि त्यांच्या शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, जिल्हा परिषद शाळांच्या बदलत्या दर्जाचे हे एक उत्तम उदाहरण मानले जात आहे.

# कलाल-कलार समाजाची प्रलंबित आर्थिक विकास महामंडळाची मागणी अधिवेशनात पुर्ण होईल का?-रमेश लांजेवार.

गेल्या चार वर्षांपासून कलाल-कलार समाजाला न्याय मिळावा यासाठी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना सातत्याने प्रयत्न करीत आहे.परंतु सरकारला अजुनपर्यंत जाग आलेला दिसत नाही.समाजाला न्याय मिळावा यासाठी २०२२ मध्ये नागपूर विधानसभेवर मोर्चा काढण्यात आला होता, यानंतर २०२३ मध्ये पुन्हा नागपूर विधानसभेवर भव्य मोर्चा काढण्यात आला आणि नुकताच ७ आक्टोंबर २०२५ ला मुंबई येथे आझाद मैदानावर मोठे आंदोलन करण्यात आले.यादरम्यान सुद्धा मंत्री महोदय अतुलजी सावे यांना निवेदन देण्यात आले. याव्यतीरीक्त वेगवेगळ्या मंत्र्यांना व संबंधित मंत्रीमहोदयांना निवेदन देऊन समाजाच्या समस्यांबद्दल अवगत सुध्दा करण्यात आले.या मोर्च्यादरम्यान व आंदोलनादरम्यान सरकारला समाजाच्या मागण्यांचा वेळोवेळी निवेदने व पाठपुरावा सुध्दा करण्यात आला.या व्यतीरिक्त मेल व्दारे व टपाद्वारे संपूर्ण पाठपुरावा करण्यात आलेला आहे.सोबतच संबंधित मंत्री,मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांना आतापर्यंत १०० ते १५० पाणांचा पाठपुरावा सुध्दा केलेला आहे आणि हा पाठपुरावा समाजाला न्याय देण्यासाठी सरकारजवळ भरपूर आहे असे संघटनेला वाटते. त्याचप्रमाणे अनेक वर्तमानपत्रांच्या माध्यमातून कलाल-कलार समाजाच्या समस्या महाराष्ट्र सरकारपुढे पोहचविण्यात आल्या. कारण सत्य परिस्थिती राज्याच्या जनतेपुढे मांडने हे समाजाचे कर्तव्य आहे असे समाजाचे ध्येय आहे.आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात संबंधित खात्याचे मंत्री, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याशी चर्चा सुध्दा झाल्यात प्रत्येक मंत्री महोदयांनी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे आम्हाला ठोस आश्वासन सुध्दा दिले. परंतु आज चार ते पाच वर्षांचा काळ लोटत आहे तरीही सरकारला समाजाच्या प्रती व समस्यांबद्दल प्रती अजुनपर्यंत जाग आल्याचे दिसत नाही हे महाराष्ट्राचे व लोकशाहीचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल.राज्यात असेही अनेक समाज आहे की ज्या समाजाने कोणतेही आंदोलन केले नाही किंवा संघर्ष केला नाही अशाही समाजाला सरकारने आर्थिक विकास महामंडळ जाहीर केले व त्यांचे कार्य सुरू झाले आहे याचेही महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना स्वागत करते.कारण कोणताही समाज असो तो विकासाच्या प्रवाहात यायलाच हवा असे आमचे ध्येय आहे.महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या अल्पशा मागण्या सरकार दरबारी आहेत आणि त्याबद्दल ठोस पाठपुरावे सुध्दा केले आहेत.याच अनुषंगाने समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी व समाजाच्या युवकांना रोजगार मिळावा यासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावे, विश्वकर्मा योजने अंतर्गत समाजाचा पारंपरिक मद्य व्यवसाय समाजाला देण्यात यावा इत्यादी समाज हिताच्या मागण्यांच्या संदर्भात सतत संघर्ष व पाठपुरावे सुरूच आहे आणि सुरूच राहील.या पत्राद्वारे सरकारला पुन्हा विनंती करण्यात येते की,समाजाच्या प्रतीमहाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेचा पाठपुरावा, संघर्ष,आंदोलन, वेळोवेळी दिलेले निवेदन, पत्रव्यवहार आणि समाजावर होत असलेला अन्याय या संपूर्ण बाबींचा सरकारने, संबंधित मंत्रीमहोदय, मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, प्रशासन यांनी गांभीर्याने विचार करावा व इतर समाजाप्रमाणे कलाल-कलार समाजासाठी भगवान सहस्त्रार्जुन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून समाजाला योग्य न्याय मिळवून द्यावा अशी आग्रहाची विनंती महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटने मार्फत सरकारला व संबंधित मंत्रीमहोदयांना करण्यात येत आहे. अन्यथा आम्हाला पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. करीता सरकारला पुन्हा विनंती करण्यात येते समाजाचा अंत न पहाता सरकारने समाजाचे गांभीर्य लक्षात घेऊन समाजाच्या मागण्यांनवर सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तातडीने ठोस निर्णय घ्यावा व समाजाला विकासाच्या प्रवाहात आणावे.अशी मागणी महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटनेच्या वतीने सरकारला करण्यात येत आहे.जय कलार!जय हिंद.

# जालना: श्री शितला माता मंदिर परिसरात स्वच्छता व मूलभूत सुविधा पुरवण्याची मागणी

**प्रशासनाला निवेदन; ६० हजारांहून अधिक भाविक दर्शनासाठी येण्याची शक्यता**

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी/**जालना शहरातील काद्राबाद भागातील दर्गा वेस परिसरात असलेल्या निजामकालीन प्राचीन श्री शितला माता मंदिर परिसरात आगामी पूजा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्वच्छता करावी आणि विविध नागरी सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे महाराष्ट्र प्रदेश संघटक विकासकुमार बागडी यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जालना महानगरपालिकेच्या महापौर वंदना मगरे यांना सविस्तर निवेदन दिले आहे.

येत्या ४ मार्च ते १६ मार्च २०२६ या कालावधीत श्री शितला माता पूजा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या महोत्सवासाठी मारवाडी, अग्रवाल, माहेश्वरी, ब्राह्मण, जैन, माळी, नाई, जाट यासह सकल राजस्थानी बहुभाषिक समाजाचे सुमारे ६० हजारांहून अधिक भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. या गर्दीचे नियोजन करण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलणे गरजेचे असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

निवेदनातील प्रमुख मागण्या:स्वच्छता व आरोग्य: मंदिर परिसर आणि जोडणाऱ्या रस्त्यांची संपूर्ण स्वच्छता करावी. कचरा संकलनासाठी विशेष पथकाची नियुक्ती करावी.प्रकाश व्यवस्था: परिसरात नवीन पथदिवे बसवून रात्रीच्या वेळी पुरेसा प्रकाश राहील याची खात्री करावी.मूलभूत सुविधा: भाविकांसाठी तात्पुरते शौचालय उभारणे आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.वाहतूक व सुरक्षा: वाहनांची गर्दी टाळण्यासाठी वाहतूक नियंत्रण आणि पार्किंगची चोख व्यवस्था करावी.वैद्यकीय मदत: आपत्कालीन परिस्थितीसाठी मंदिर परिसरात वैद्यकीय पथक तैनात करावे.

महोत्सवाच्या काळात गर्दीचा फायदा घेऊन अनुचित प्रकार घडू नये, यासाठी विकासकुमार बागडी यांनी भाविकांना विशेष आवाहन केले आहे. गर्दी लक्षात घेता महिला व मुलांनी सोन्या-चांदीचे दागिने किंवा महागड्या वस्तू सोबत आणू नयेत, जेणेकरून चोरीच्या घटनांना आळा बसेल, असे त्यांनी नमूद केले.महानगरपालिका प्रशासन या मागण्यांची दखल घेऊन भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देते का, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.




# नोंदणी व मुद्रांक विभाग: शिपाई (गट-ड) पदांची अंतिम निवड यादी जाहीर

**२८४ रिक्त जागांच्या भरतीचा मार्ग मोकळा**

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/**नोंदणी व मुद्रांक विभागातील नोकरीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांसाठी एक महत्त्वाची बातमी आहे. विभागातील शिपाई (गट-ड) संवर्गातील रिक्त असलेल्या २८४ पदांच्या भरती प्रक्रियेची अंतिम निवड यादी अखेर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मुंबई शहरचे सह जिल्हा निबंधक भरत गरुड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे ही माहिती दिली.या पदांसाठीची भरती प्रक्रिया गेल्या वर्षीपासून सुरू होती. यातील महत्त्वाचे टप्पे खालीलप्रमाणे राहिल.

जुलै २०२५: आयबीपीएस (IBPS) कंपनीमार्फत ऑनलाइन परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.

२० ऑगस्ट २०२५: परीक्षेचा निकाल विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला.

कागदपत्र पडताळणी: परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल पडताळणी केल्यानंतर आता अंतिम प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागाने पारदर्शकतेसाठी विविध प्रकारच्या याद्या संकेतस्थळावर अपलोड केल्या आहेत. यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

**अंतिम निवड यादी:** ज्या उमेदवारांची नियुक्ती निश्चित झाली आहे.

**प्रतीक्षा यादी:** निवड झालेल्या उमेदवारांनी संधी नाकारल्यास या उमेदवारांना प्राधान्य मिळेल.

**नकार दिलेले उमेदवार:** ज्या उमेदवारांनी निवडीसाठी स्वतःहून नकार दर्शवला.अपात्र उमेदवार: कागदपत्र पडताळणीत निकष पूर्ण न करू शकलेले उमेदवार.गैरहजर उमेदवार: पडताळणी प्रक्रियेला अनुपस्थित राहिलेल्या उमेदवारांची यादी.उमेदवारांनी अधिकृत माहितीसाठी आणि आपली नावे तपासण्यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

# नाते संपत्तीपेक्षा श्रेष्ठ: मुंबई उच्च न्यायालयाचा भाऊ-बहिणींना भावनिक साद

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** आयुष्याच्या संध्याकाळी मालमत्तेसाठी न्यायालयात लढण्यापेक्षा, भावंडांनी एकमेकांसाठी त्याग करायला शिकले पाहिजे, अशा शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने एका वृद्ध भाऊ-बहिणीला मोलाचा सल्ला दिला आहे. आई-वडिलांच्या संपत्तीवरून सुरू असलेल्या कायदेशीर लढाईत एकमेकांविरुद्ध वापरलेली खालच्या पातळीची भाषा पाहून न्यायालयाने तीव्र नाराजी आणि दुःख व्यक्त केले.

न्यायमूर्तींचे निरीक्षण: 'रक्षाबंधन' आणि 'भाऊबीज' केवळ सण नाहीत!

न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या एकलपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी त्यांनी भारतीय संस्कृतीतील नात्यांच्या मूल्यांची आठवण करून दिली. संस्कृतीचे रक्षण: न्यायमूर्तींनी रक्षाबंधन आणि भाऊबीज या सणांचा उल्लेख करत सांगितले की, हे सण केवळ विधी नसून ते प्रेम, विश्वास आणि संरक्षणाचे प्रतीक आहेत.नात्याची वीण: बहिणीला तिचा भाऊ पाठीशी उभा असल्याची खात्री असते, तर भावाला बहिणीसारखी विश्वासू व्यक्ती दुसरी कोणी वाटत नाही. हे नाते विशेष आहे, असे भावनिक उद्गार त्यांनी काढले.

ही लढाई दोन वृद्ध भावंडांमध्ये आहे, जे धार्मिक प्रवृत्तीचे असूनही मालमत्तेसाठी एकमेकांचे शत्रू बनले आहेत.कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय: शहर दिवाणी न्यायालयाने बहिणीची बाजू मांडणारी 'लेखी कैफियत' (Written Statement) दाखल करण्याची विनंती फेटाळली होती. उच्च न्यायालयाचा हस्तक्षेप: उच्च न्यायालयाने दिवाणी न्यायालयाचा हा निर्णय रद्द केला. केवळ वकिलाच्या उपस्थितीवरून तिला सर्व कायदेशीर प्रक्रिया माहित होती, असे गृहीत धरणे चुकीचे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.

**कठोर शब्दांवर नाराजी**

दोन्ही भावंडांनी एकमेकांविरुद्ध तक्रारींमध्ये जी आक्षेपार्ह भाषा वापरली आहे, ती न्यायालयाच्या आदेशात नमूद करण्याच्या लायकीची देखील नसल्याचे न्यायमूर्तींनी नमूद केले.

तज्ज्ञांचे मत: सामंजस्य हाच खरा उपाय

या निकालावर नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ॲड. महेश धनावत यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.लोभ आणि अहंकारामुळे आज पिढ्यानपिढ्यांची नाती तुटत आहेत. न्यायालयात जाण्यापूर्वी कुटुंबातच मध्यस्थीने (Mediation) तोडगा काढल्यास वेळ, पैसा आणि नाती तिन्ही वाचवता येतात. संपत्ती ही रक्ताच्या नात्यापेक्षा कधीही मोठी असू शकत नाही.

**भविष्यातील वाद टाळण्यासाठी उपाय:**

कायदेशीर सल्लागारांच्या मदतीने वेळेत वाटणीपत्र (Partition Deed) तयार करावे.

कौटुंबिक करार (Family Settlement) करून स्पष्टता ठेवावी.

न्यायालयाचा शेवटचा संदेश

निकाल देताना न्यायमूर्ती जैन यांनी एक मार्मिक वाक्य उच्चारले, जे प्रत्येक कुटुंबासाठी मार्गदर्शक ठरू शकते.भाऊ आणि बहिणीचे नाते कधी घट्ट विणलेले असते, तर कधी थोडे सैल असते, पण ते कधीही तुटत नाही.न्यायालयाने दोन्ही पक्षांना जुने वाद विसरून पुन्हा सलोख्याने राहण्याचा आणि नात्यातील शांतता प्रस्थापित करण्याचा सल्ला दिला आहे.

# परतूर नगर परिषदेत 'दांडीबहाद्दर' अधिकाऱ्यांचा सुळसुळाट..पान नं.१ वरून..!

जर अधिकारीच उपस्थित नसतील, तर नगरसेवकांनी आपले प्रश्न मांडायचे कोणासमोर?

गैरहजर राहणाऱ्या सर्व 'दांडीबहाद्दर' अधिकाऱ्यांची यादी जाहीर करा.संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ 'कारणे दाखवा' (Show Cause) नोटिसा बजावण्यात याव्या.या अधिकाऱ्यांच्या बेजबाबदारपणामुळे बैठकीचे जे नुकसान झाले, त्याबाबत लेखी स्पष्टीकरण घेण्यात यावे.भविष्यात असा प्रकार घडल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा.गणेश नळगे यांच्या आक्रमक पवित्र्यानंतर नगर परिषदेच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. मुख्यधिकाऱ्यांनी हे निवेदन स्वीकारले असून, या प्रकरणाची गंभीर दखल घेण्याचे आश्वासन दिले आहे. अनुपस्थित अधिकाऱ्यांकडून खुलासा मागवून योग्य ती प्रशासकीय कारवाई केली जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

या निवेदनानंतर आता मुख्यधिकारी खरोखरच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारणार की हे प्रकरण थंड बस्त्यात पडणार, याकडे परतूरकरांचे लक्ष लागले आहे.

# जिल्हा परिषदेत लाचेचा विळखा!

## निवृत्त कर्मचाऱ्याला १०,००० रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** शासकीय कार्यालयांमध्ये फोफावलेल्या भ्रष्टाचाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. जिल्हा परिषद कार्यालयातून कामाचे 'कॉन्ट्रॅक्ट लायसन्स' काढून देण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (-उइ) सापळा रचून रंगेहाथ अटक केली आहे.




तक्रारदार आणि त्यांच्या मित्राला जिल्हा परिषद कार्यालयाच्या बांधकाम विभागामार्फत निघणारी शासकीय कामे (ठेकेदारी/गुत्तेदारी) मिळवायची होती. यासाठी आवश्यक असलेले 'नोंदणी प्रमाणपत्र' (लायसन) मिळवून देण्यासाठी आरोपी नंदकिशोर आसाराम चव्हाण (वय ६१ वर्षे) याने मध्यस्थी केली होती. चव्हाण हा पाणी पुरवठा विभागातून सेवानिवृत्त झालेला कनिष्ठ सहाय्यक असून तो सध्या 'खाजगी इसम' म्हणून कार्यरत होता.

१४ हजारांची मागणी, १० हजारात तडजोड

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही फाईल्सचे काम करण्यासाठी आरोपीने प्रत्येकी ७,००० रुपये प्रमाणे एकूण १४,००० रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. मात्र, तडजोडीनंतर १०,००० रुपये स्वीकारण्याचे त्याने मान्य केले. लाचेची रक्कम स्वीकारण्याचे पंचांसमक्ष कबूल केल्यानंतर एसीबीच्या पथकाने आपले जाळे विणले.

जिल्हा परिषदेच्या गेटसमोरच ठोकल्या बेड्या!

दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी, जिल्हा परिषद कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरच लाचेचा व्यवहार ठरला होता. तक्रारदाराकडून १०,००० रुपये स्वीकारत असतानाच दबा धरून बसलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने झडप घालून नंदकिशोर चव्हाणला ताब्यात घेतले. ही कारवाई होताच जिल्हा परिषद परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

आरोपी: नंदकिशोर आसाराम चव्हाण (वय ६१, रा. पडेगाव, छत्रपती संभाजीनगर).लाचेची रक्कम: १०,००० रुपये (स्विकारलेली) गुन्हा दाखल: क्रांतीचौक पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा नोंदवण्याची प्रक्रिया सुरू आहे.

मार्गदर्शक अधिकारी: पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे आणि पोलीस उप अधीक्षक श्री. राजीव तळेकर,तपास अधिकारी: पोलीस निरीक्षक चैनसिंग गुसिंगे आणि शांतीलाल चव्हाण, जर कोणताही लोकसेवक किंवा त्यांच्या वतीने कोणीही लाचेची मागणी करत असेल, तर घाबरून न जाता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलीस उप अधीक्षक राजीव तळेकर यांनी केले आहे.

## ७ वर्षांच्या अरशिया शेखचा पहिला रोजा पूर्ण; साजापूर परिसरातून कौतुकाचा वर्षाव

**आत्ताच एक्सप्रेस**

**साजापूर (प्रतिनिधी)** रमजानचा पवित्र महिना हा आत्मसंयम, शिस्त आणि भक्तीचा संदेश देणारा काळ मानला जातो. याच भक्तीचा एक प्रेरणादायी आदर्श गंगापूर तालुक्यातील साजापूर येथील एका चिमुकलीने सर्वांसमोर ठेवला आहे. अवघ्या ७ वर्षांच्या अरशिया शाहरुख शेख हिने कडक उन्हाची तमा न बाळगता आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण केला. तिच्या या जिद्दीचे आणि धैर्याचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत आहे.



सध्या उन्हाळ्याचा कडाका वाढत असून तापमानात मोठी वाढ झाली आहे. अशा तप्त वातावरणात दिवसभर अन्न-पाण्याविना राहणे मोठ्या व्यक्तींसाठीही आव्हानात्मक असते. मात्र, चिमुकल्या अरशियाने पहाटेच्या 'सेहरी'पासूनच रोजा धरण्याचा ठाम निश्चय केला होता. दिवसभर तहान-भुकेची जाणीव न होऊ देता, तिने अत्यंत आनंदाने आणि उत्साहाने हा उपवास पाळला. सायंकाळी सूर्यास्तानंतर इफ्तारच्या वेळी खजूर प्राशन करून तिने आपला पहिला रोजा पूर्ण केला.

कुटुंबीयांकडून उत्साहात कौतुक

अरशियाने इतक्या लहान वयात दाखवलेली धार्मिक ओढ पाहून शेख कुटुंबात आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण आहे. तिच्या या यशाबद्दल वडील: शाहरुख शेख,आजोबा: कासम भिकन शेख तसेच इतर नातेवाईक आणि मित्र परिवाराने तिचे विशेष अभिनंदन केले.

इतक्या लहान वयात कडक उन्हातही अरशियाने दाखवलेली जिद्द आणि धार्मिक संस्कारांचे पालन करण्याची ओढ पाहून आम्हाला तिचा सार्थ अभिमान वाटतो, अशी भावना तिच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.अरशियाच्या या कामगिरीची बातमी साजापूर गावात पसरताच ग्रामस्थांनी तिचे कौतुक केले. केवळ गावातच नव्हे, तर सोशल मीडियाच्या माध्यमातूनही या चिमुकल्या 'रोझेदारा'वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेकांनी अरशियाच्या या धैर्याला सलाम करत तिला भावी आयुष्यासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत. धार्मिक संस्कार आणि बालमनांमधील जिद्द यांचा एक अनोखा संगम अरशियाच्या रूपाने पाहायला मिळाला आहे.

## ईव्हीएमकडे बोट दाखवण्यापेक्षा 'रडतराऊतांनी' जनतेत जावे: नवनाथ बन यांचा घणाघात

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** ईव्हीएमवर शंका उपस्थित करणाऱ्या संजय राऊतांवर भाजपाचे प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत जोरदार टीका केली. लोकसभेत ३० जागा जिंकल्यावर ईव्हीएम योग्य होते, मग विधानसभेला पराभव झाल्यावरच ते चुकीचे कसे? असा सवाल करत त्यांनी राऊतांची अवस्था 'नाचता येईना अंगण वाकडे' अशी झाल्याचा टोला लगावला. राऊतांनी रडत न बसता जनतेत जाऊन काम करावे, असा सल्लाही त्यांनी दिला.

प्रमुख मुद्दे:

संविधानाचा अवमान: राऊत सातत्याने निवडणूक आयोग आणि सर्वोच्च न्यायालय यांसारख्या घटनात्मक संस्थांचा अपमान करत असून, जनता त्यांना नक्कीच धडा शिकवेल, असे बन म्हणाले.

हिंसेचा निषेध: पुण्यातील काँग्रेस प्रवक्ते हनुमंत पवार यांच्यावरील हल्ल्याचा भाजपाने निषेध केला. विचारांची लढाई विचारांनीच लढली पाहिजे, असे स्पष्ट करत गृहखात्याने कारवाई सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली.

रोहित पवारांवर टीका: मविआ काळात पत्रकारांना अटक आणि नौदल अधिकाऱ्यांवरील हल्ल्यावेळी रोहित पवारांना 'राजधर्मा'ची आठवण का झाली नाही? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

ठाकरेंना प्रत्युत्तर: जीवे मारण्याच्या धमक्या देण्याची भाजपाची संस्कृती नाही. उलट उद्धव ठाकरेंनीच निवडणुकीत एक तर तू राहशील किंवा मी अशी धमकी देवेंद्र फडणवीसांना दिली होती, याची आठवण त्यांनी करून दिली.

शेवटी, भाजपाने मोठे मन दाखवत एकनाथ शिंदेंना मुख्यमंत्री केले, पण ठाकरेंकडे साधे मंत्रीपद देण्याचीही दानत नाही, अशी टीकाही त्यांनी केली.

## नादरपूर नगरी दुमदुमणार विठ्ठल नामाच्या जयघोषात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड (प्रतिनिधी)** तालुक्यातील नादरपूर येथील ग्रामस्थांच्या वतीने आयोजित आणि वारकरी संप्रदायाची मोठी परंपरा असलेला 'अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा' सोहळा आजपासून (गुरुवार) मोठ्या उत्साहात सुरू होत आहे. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात होणाऱ्या या २६ व्या वार्षिक महोत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे.ह.भ.प. सुरेंद्र महाराज आनंदे यांच्या आशीर्वादाने आणि ह.भ.प. बाबासाहेब महाराज आनंदे (दौलताबादकर) यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ह.भ.प. मुरारी महाराज आनंदे आणि ह.भ.प. उद्धव महाराज आनंदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभत आहे.

**'अखंड हरिनाम सप्ताह व श्रीमद भागवत कथा' सोहळ्याचा दिमाखात प्रारंभ!**

दिवसभर रंगणार भक्तिरंग (दैनंदिन कार्यक्रम):

सप्ताहाच्या कालावधीत दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन, त्यानंतर विष्णू सहस्त्रनाम, सकाळी १० ते १ संगीत भागवत कथा, दुपारी ३ ते ५ गाथा भजन आणि सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ होणार आहे. रात्री ९ ते ११ या वेळेत महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची हरिकीर्तन सेवा संपन्न होईल.

**वृंदावनचे 'श्रीरामजी महाराज' करणार कथा निरूपण**

या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. श्रीरामजी महाराज निकम (श्रीधाम वृंदावन) यांच्या रसाळ वाणीतून भाविकांना श्रीमद भागवत कथेचे श्रवण करण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.सप्ताहात दररोज रात्री ९ वाजता खालील कीर्तनकारांची सेवा होणार आहे.गुरुवार: ह.भ.प. शंकर महाराज निकम (आळंदी/नादरपूरकर),शुक्रवार: ह.भ.प. साध्वी दुर्गा दिदी महाराज (बिडकीन),शनिवार: ह.भ.प. दीपक महाराज ठोकळ (माळेगावकर),रविवार: ह.भ.प. एकनाथ महाराज पवार (जातेगाव, मोठा महादेव),सोमवार: ह.भ.प. हेमराज महाराज (अंजनविहरे, पाचोरा),मंगळवार: ह.भ.प. सुधाकर महाराज वाघ (पैठणकर),बुधवार: ह.भ.प. ज्ञानेश्वर विष्णू महाराज **'दादा'** (श्रीक्षेत्र आपेगावकर),काल्याचे कीर्तन आणि महाप्रसाद

गुरुवार, दि. ५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते १ या वेळेत ह.भ.प. मुरारी महाराज आनंदे (देवगिरी, पालखी चालक) यांच्या काल्याच्या कीर्तनाने या सोहळ्याची सांगता होईल.

त्यानंतर उपस्थित सर्व भाविकांसाठी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.भक्तीच्या या महाकुंभात पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा व श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळी, नादरपूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# मराठवाड्यात 'एकल महिला' सक्षमीकरणाचा श्रीगणेशा; ग्रामीण भागात ४.९३ लाख महिलांची नोंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** मराठवाडा विभागातील विधवा, घटस्फोटीत, परित्यक्ता आणि चाळीस वर्षांपुढील अविवाहित महिलांच्या आर्थिक आणि सामाजिक उत्थानासाठी विभागीय प्रशासनाने कंबर कसली आहे. विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या संकल्पनेतून विभागात विशेष सक्षमीकरण कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, प्राथमिक सर्वेक्षणात ग्रामीण भागात तब्बल ४ लाख ९३ हजार ४५० एकल महिला आढळून आल्या आहेत.

सर्वेक्षणातून समोर आलेली महत्त्वाची आकडेवारी

विभागातील आठही जिल्ह्यांत अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात आले. यात प्रामुख्याने विधवा महिलांची संख्या मोठी असल्याचे दिसून आले आहे.एकूण नोंदणी (ग्रामीण): ४,९३,४५० महिला,विधवा महिला: ४,८४,६३७,परित्यक्ता महिला: २१,१४२,अविवाहित (वय ४०+): १६,६३७,घटस्फोटीत महिला: १४,४६३ प्रशासनाने केलेल्या विश्लेषणानुसार, १८ ते ५० वयोगटातील महिलांचे प्रमाण सुमारे ३२ टक्के आहे. यामध्ये १८ ते ३० वयोगटातील ३२,९६६ आणि ३१ ते ५० वयोगटातील १,३९,७६२ महिलांचा समावेश आहे. तसेच ५१ ते ६५ वयोगटातील १.६४ लाख आणि ६५ वर्षांवरील २.०३ लाख ज्येष्ठ महिलांची नोंद झाली आहे.या महिलांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विभागीय महिला व बाल विकास उपायुक्त यांची 'विभागीय नोडल अधिकारी' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. विभागीय आयुक्तांनी नुकतीच सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेऊन खालील महत्त्वाचे निर्देश दिले आहेत:

**सर्वेक्षणातून समोर आलेली महत्त्वाची आकडेवारी**

**एकूण नोंदणी (ग्रामीण):** ४,९३,४५० **महिला**

**विधवा महिला:** ४,८४,६३७,

**परित्यक्ता महिला:** २१,१४२,

**अविवाहित (वय ४०+):** १६,६३७,

**घटस्फोटीत महिला:** १४,४६३

एकल महिलांचे प्रश्न गंभीर असून त्यांना प्रशासकीय योजनांचा लाभ मिळवून देणे ही आमची प्राथमिकता आहे. प्रत्येक जिल्ह्याने या सक्षमीकरण मोहिमेसाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना राबवाव्यात.
**- जितेंद्र पापळकर, विभागीय आयुक्त.**



१. कागदपत्रांची उपलब्धता: आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र आणि आयुष्यमान कार्ड यांसारखी आवश्यक कागदपत्रे ग्रामपंचायत स्तरावरच उपलब्ध करून दिली जातील.

२. बालसंगोपन योजना: एकल महिलांच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी मदत मिळावी यासाठी 'बालसंगोपन योजने'चे अर्ज शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत भरून घेतले जातील.

३. आर्थिक स्वावलंबन: रोजगारक्षम महिलांना 'महिला बचत गटां'मध्ये समाविष्ट केले जाईल. तसेच प्रत्येक तालुक्यात महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी विशेष कार्यशाळांचे आयोजन करण्यात येईल.

४. नागरी भागाचे सर्वेक्षण: ग्रामीण भागातील काम पूर्ण झाल्यानंतर आता नागरी (शहरी) भागातील एकल महिलांचे सविस्तर सर्वेक्षण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या उपक्रमामुळे मराठवाड्यातील लाखो एकल महिलांना सन्मानाने जगण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी मोठी मदत मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे छत्रपती संभाजीनगरमध्ये आगमन

### राज्यपाल आणि पालकमंत्र्यांनी केले जंगी स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज बुधवारी सकाळी १०:१० वाजता छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमन झाले. त्यांच्या या संक्षिप्त भेटीदरम्यान प्रशासकीय आणि राजकीय नेत्यांच्या वतीने त्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

विमानतळावर राष्ट्रपतींचे विशेष विमानाने आगमन होताच, राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी राजशिष्टाचारानुसार विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. प्रामुख्याने संजय शिरसाट: राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री.

समीर राजुरकर: महापौर, छत्रपती संभाजीनगर,डॉ. कल्याणराव काळे: खासदार,प्रदीप जयस्वाल: आमदार, अनुराधा चव्हाण: आमदार प्रशासकीय पातळीवर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी आणि पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी राष्ट्रपतींचे स्वागत करून सुरक्षेचा आढावा घेतला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये काही वेळ थांबल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि राज्यपाल आचार्य देवव्रत हे भारतीय वायुसेनेच्या विशेष हेलिकॉप्टरने शेगाव (जि. बुलडाणा) कडे रवाना झाले. शेगाव येथील नियोजित आध्यात्मिक आणि सार्वजनिक कार्यक्रमांना त्या उपस्थित राहणार आहेत.राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर विमानतळ परिसर आणि शहरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. विमानतळ प्राधिकरणानेही विशेष व्यवस्था केली होती.

## बार्टी आणि MCED तर्फे मोफत 'निवासी' उद्योजकता प्रशिक्षण

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी/** अनुसूचित जाती प्रवर्गातील युवक-युवतींना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आणि उद्योजक बनण्यासाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED) यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे मोफत 'निवासी तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

**अनुसूचित जातीच्या तरुणांसाठी मोठी संधी**

या प्रशिक्षणाद्वारे तरुणांना केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर प्रत्यक्ष उद्योगासाठी लागणारे तांत्रिक कौशल्य आणि व्यवस्थापकीय धडे दिले जाणार आहेत.

या कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षणार्थ्यांना खालील विषयांचे सखोल मार्गदर्शन तज्ज्ञांकडून दिले जाईल.

**तांत्रिक व प्रात्यक्षिक ज्ञान:** संबंधित विषयाचे प्रत्यक्ष कामाचे अनुभव आणि तांत्रिक शिक्षण.

**उद्योग उभारणी:** नवीन व्यवसाय कसा सुरू करावा, याचे टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन.

शासकीय योजना: विविध सरकारी कर्ज योजना आणि अनुदानाची माहिती.

व्यवस्थापन कौशल्य: प्रकल्प अहवाल (Project Report) तयार करणे, विक्री कला (Sales), आणि व्यवस्थापन.

कायदेशीर माहिती: कर कायदा (Taxation), आवश्यक लायसन्स आणि इतर कायदेशीर बाबी.

क्षेत्र भेटी: प्रत्यक्ष उद्योगांना भेटी देऊन कामकाजाची माहिती घेणे.

पात्रता आणि अटी

प्रशिक्षणासाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या उमेदवारांनी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे:

**वय:** १८ ते ४५ वर्षे.

प्रवर्ग: उमेदवार अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील असावा.

**रहिवासी:** गेल्या १५ वर्षांपासून महाराष्ट्राचा रहिवासी असणे अनिवार्य.

शिक्षण:

**१ महिना प्रशिक्षण:** किमान १० वी उत्तीर्ण.

**२ महिने प्रशिक्षण:** किमान पदवीधर (Engineering, Polytechnic, MCA, BCA, MSc, BSc धारकांना प्राधान्य).

**आवश्यक कागदपत्रे**

प्रवेश अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे:

आधार कार्ड आणि पासपोर्ट आकाराचे फोटो.

जातीचा दाखला.

शाळा सोडल्याचा दाखला (TC).

अंतिम सत्राची गुणपत्रिका.

रहिवासी दाखला (डोमिसाईल).

अर्ज कोठे आणि कसा करावा?

प्रशिक्षणार्थ्यांची निवड मुलाखतीद्वारे केली जाईल.इच्छुक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी व नाव नोंदणीसाठी खालील पत्त्यावर संपर्क साधावा:

पत्ता: महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED), जिल्हा कार्यालय, अ-३८, चखऊ रेल्वे स्टेशन परिसर, छत्रपती संभाजीनगर.

विभागीय अधिकारी सुभाष थोटे व बार्टीचे प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

## 'आई महोत्सवा'निमित्त सोयगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची मोफत दंत तपासणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव/प्रतिनिधी/** जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतील 'दशसूत्री उपक्रम' अंतर्गत विद्यार्थ्यांना आरोग्यक्षम बनवण्याच्या उद्देशाने, सोयगाव येथे एका विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. स्थानिक जिल्हा परिषद केंद्र प्राथमिक शाळेत 'आई महोत्सवा'चे औचित्य साधून विद्यार्थ्यांसाठी मोफत दंत तपासणी शिबिर उत्साहात पार पडले.

तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन

या शिबिराचे आयोजन समाज प्रबोधनकार विष्णू मापारी व आरोग्य दूत डिगंबर वाघ यांनी केले होते. शेंदुर्णी येथील सुप्रसिद्ध दंततज्ञ डॉ. चैतन्य कासार आणि डॉ. सौ. पूजा कासार यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांची सखोल दंत तपासणी केली. केवळ तपासणीच नव्हे, तर दात स्वच्छ कसे ठेवावेत आणि तोंडाचे आरोग्य राखण्यासाठी कोणती काळजी घ्यावी, याबद्दल डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.



मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाला परिसरातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. यात प्रामुख्याने संजय शहापूरकर (समाजसेवक), रवींद्र काळे (अध्यक्ष, माजी विद्यार्थी संघ),मंगेश सोहनी (उपाध्यक्ष),अरुण सोहनी (कृषी भूषण), फिरोज तडवी (केंद्र प्रमुख, सोयगाव) ,संतोष सोनवणे, कृष्णा पाटील आणि इतर मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आरोग्याचे महत्त्व पटवून दिले.

खाऊ आणि टूथपेस्टचे वाटप

केवळ आरोग्य तपासणीवर न थांबता, आयोजकांनी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना टूथपेस्ट आणि बिस्किट पुड्यांचे वाटप केले. यामुळे मुलांमध्ये स्वच्छतेच्या सवयीबद्दल सकारात्मकता निर्माण झाली.शिक्षक वृंदांचे परिश्रम हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आरोग्य दूत डिगंबर वाघ यांच्यासह मुख्याध्यापक किरण पाटील, पदवीधर शिक्षिका सुरेखा चौधरी, पंकज रगडे, रामचंद्र महाकाळ, मंगला बोरसे, सविता पाटील, प्रतिभा कोळी, गणेश बावस्कर, अंकुश काळे, मंदा मस्के, पांडुरंग बारगजे, विवेक महाजन, अनिल देसाई, तानाजी चव्हाण, शुभम देसले आणि पुनम लाड यांनी विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन मंगला बोरसे यांनी केले, तर उपस्थित सर्वांचे आभार पंकज रगडे यांनी मानले.

# प्रारंभीक अधिसूचना

**भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्दाकतेया हक्क अधिनियम २०१३ चे कलम ११ (१) खालील अधिसुचना**

**जा.क्र.२०२३/भूसंपादन/जि.आर**
**कार्यालय उपविभागीय अधिकारी परतूर**
**दिनांक २३.१.२०२६**

भूसंपादन, पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्दाकतेया हक्क अधिनियम २०१३ (२०३ चा ३०) कलम ३ च्या खंड ई च्या व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली शासकीय अधिसुचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण/११/२०१४/ प्र.क्र. ७७/८-२ दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापूढे उक्त अधिसूचना असा करण्यात आला आहे) यात यापुढे असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनिमयाच्या कलम ३ च्या खंड (झेड-अ) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्रा करीता जमीन संपादन करण्यांच्या संबंधात अशा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचने नूसार समुचित शासन असलेल्या जालना जिल्याच्या जिल्हाधिका-यास या सोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश उक्न जमीन असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा आवश्यकता भारण्याची शक्यता आहे असे वाटते.

ज्याच्या स्वरुपाचे वर्णन या सोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतूदीने याव्दारे असे अधिसुचित करण्यात येते की, उक्त जमीनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनसाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.आणि ज्याअर्थी प्रस्तावीत भूसंपादनाच्या बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे या सोबत जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये दिलेली आहेत.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट कलम (१) पुनर्वसन व पुर्नस्थापना याप्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशिल या सोबत जोडलेल्या अनुसूची पांच मध्ये दिलेला आहे.

ज्याअर्थी आता असे घोषीत करण्यात येते की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम ४ नूसार कोणती ही व्यक्ती ही अधिसुचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधी पर्यत उक्त जमीनीचा अथवा तिच्या भागाचा कोणता ही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमीनीवर कोणता ही भार निर्माण करणार नाही. परंतू उक्त जमीनीच्या अथवा तिच्या भागाचा मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकारी यांना विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतूदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतू आणखी असे की कोणत्या ही व्यक्तीने या तरतूदीचे बध्दीपरस्पर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्या ही हानीची किंवा नुकसानीची जिल्हाधिकारी यांचे कडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी, भूमीसंपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र नियम २०१४ यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त नियम असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्या प्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व ते पूर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनिमाच्या कलम ३ च्या उपखंड (छ) अन्वये समुचित शासन असलेल्या जिल्हाधिकारी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिकारी यांची कार्ये पारपाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी परतूर जि. जालना यास पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूची व जमिनीचा तपशील

**अनुसूची १**

**गावाचेः जालना पाझर तलाव क्रमांक १३**

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजीत क्षेत्र (हे. आर) |
|---|---|---|
| १ | ६४/६ | ०.६४ |
| २ | ६४/६ | ०.६५ |
| ३ | ६४/७ | ०.११ |
| ४ | ६४/१० | ०.११ |
| | **एकूण** | **१.५१** |

**अनुसूची-२**

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपा बाबत वर्णन

**प्रकल्पाचे नांव** : मौजे खोराडसावंगी ता. मंठा जि. जालना येथील पाझर तलाव क्र. १३ करीता भूसंपादन.

**प्रकल्पाचे वर्णन** : मौजे खोराडसावंगी ता. मंठा जि. जालना येथील पाझर तलाव क्र. १३ करीता गट क्र. ६४/६ मधून ० हे. ६४ आर, गट क्र. ६४/६ मधून ० हे. ६५ आर, गट क्र. ६४/७ मधून ० हे. ११ आर व गट क्रमांक ६४/१० मधून ० हे. ११ आर अशी एकूण १ हे. ५१ आर जमीन संपादन करणे बाबत.

**समाजास मिळणारे लाभः** मौजे खोराडसावंगी ता. मंठा जि. जालना येथील पाझर तलाव क्र. १३ करीता गट क्र. ६४/६, ६४/७, व ६४/१० मधून ०१ हे. ५१ आर जमीन संपादीत केल्यामुळे गावकऱ्यांना पाझर तलावाचे पाण्याचा लाभ होईल.

**अनुसूची-३**

**बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे.**

खोराडसावंगी ता. मंठा जि. जालना येथील पाझर तलाव क्रमांक १३ हा प्रवण भागातील जमीनीवर आहे.सदरचा पाझर तलाव हा दूर्गम भागात असून सदर पाझर तलावाचे कामा करीता शेतकऱ्यांची संम्मती आहे. या पाझर तलावामुळे कोणती ही व्यक्ती अथवा गावठाण बाधीत होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची-४**
**सामाजिक परिणाम सारांश**

नविन भूसंपादन कायदा २०१३ चे कलम ६ अन्वये सामाजिक परिणाम निर्धारणातून सूट देण्यात आलेली आहे.

**अनुसूची-५**

अ) सदर पाझर तलावामुळे जमीन मालक हे भूमीहीन होत नाहीत तसेच कोणती ही व्यक्ती विस्थापीत होत नाही त्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

ब) प्रशासकाचे कार्यालयाचा पत्ता : निरंक

क) ज्या अधिसुचने व्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे तो आदेश क्रमांक : निरंक

टिप :-उक्त जमीनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी कार्यालय परतूर जि. जालना यांचे कार्यालयात पाहण्या करीता ठेवण्यात आलेला आहे.

**स्वाक्षरीत/-**
**उपविभागीय अधिकारी**
**परतूर जि. जालना**

जा.क्र. जिमाका/जा/जाहि./२०२६/१११

# अधिकृत परवानगी की 'लूट' परवाना?

## मंठा तालुक्यात वाळू घाटांच्या नावाखाली राष्ट्रीय संपत्तीवर डल्ला!



**आत्ताच एक्सप्रेस**

मंठा (प्रतिनिधी) प्रशासकीय अधिकृततेचा बुरखा पांघरून मंठा तालुक्यातील पूर्णा नदीच्या पात्रातून राष्ट्रीय संपत्तीची दिवसाढवळ्या लूट सुरू असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. भुवन-१ आणि देवठाणा-उसवद-१ या वाळू घाटांवर नियम धाब्यावर बसवून होत असलेल्या या उत्खननाविरुद्ध मनसे आक्रमक झाली असून, जिल्हाध्यक्षांनी हे टेंडर तात्काळ रद्द करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

**नियोजनबद्ध 'सिंडिकेट'चा पर्दाफाश**

मिळालेल्या माहितीनुसार, या वाळू घाटांवर शासनाने दिलेल्या अटी व शर्तींचे उल्लंघन करून पोकलेन आणि जेसीबी सारख्या जड यंत्रांचा वापर केला जात आहे. विशेष म्हणजे, ही लूट लपवण्यासाठी एक नियोजनबद्ध पद्धत वापरली जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

**खोल उत्खननः** यंत्रांच्या सहाय्याने नदीपात्रात विहित मर्यादेपेक्षा जास्त खोल खड्डे करून वाळू उपसली जात आहे.

**पुरावे नष्ट करण्याची युक्तीः** दिवसा वाळू उपसा केल्यानंतर, त्याच यंत्रांच्या मदतीने रात्री किंवा तपासणीपूर्वी खड्डे बुजवून परिसर सपाट (Leveling) केला जातो.

**ईटीएस मोजणीत फसवणूकः** परिसर मुद्दाम सपाट केला जात असल्याने प्रशासकीय मोजणीत आणि पंचनाम्यात प्रत्यक्ष किती वाळू चोरली गेली, याचे वास्तव कधीच समोर येत नाही.

**पर्यावरणाचा ऱ्हास आणि महसूल बुडवला!**

नदी पात्रात मुरूम टाकून अनधिकृत रस्ते तयार केल्यामुळे नदीची नैसर्गिक रचना पूर्णपणे बदलली आहे.

### प्रमुख मागण्याः

**१. ईटीएस मोजणीः** नदीपात्रातील उत्खननाची तातडीने स्वतंत्र यंत्रणेद्वारे ईटीएस मोजणी करण्यात यावी.

**२. टेंडर रद्द कराः** अटींचा भंग झाल्याचे सिद्ध करून संबंधित वाळू घाटांचे टेंडर तात्काळ रद्द करावे.

**३. फौजदारी कारवाईः** पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या आणि चोरी करणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच त्यांना साथ देणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कठोर कायदेशीर गुन्हे दाखल करावेत.

यामुळे पर्यावरणाचा समतोल तर बिघडलाच आहे, पण शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूलही बुडत आहे. यात स्थानिक महसूल यंत्रणेतील काही कर्मचाऱ्यांचे अर्थपूर्ण 'आशीर्वाद' असल्याचा संशयही व्यक्त केला जात आहे.

शासनाच्या परवानगीचा गैरवापर करून वाळू माफिया पर्यावरणाची आणि सरकारी तिजोरीची लूट करत आहेत. जर प्रशासनाने पोकलेन वापराची आणि ईटीएस मोजणीची सखोल चौकशी केली नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र होईल.

**- प्रकाश सोळंके,**
**जिल्हाध्यक्ष, मनसे (जालना)**

या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असून, प्रशासन आता या वाळू माफियांवर **'बुलडोझर'** फिरवणार की केवळ कागदी घोडे नाचवणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जालन्यात पोलिसांकडून आरोपींना अभय?

**आत्ताच एक्सप्रेस**

**बदनापूर/प्रतिनिधी**/बदनापूर तालुक्यातील काजळा येथे एका शेतकऱ्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याप्रकरणी जालना पोलीस दलाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. १५ दिवसांपासून रुग्णशय्येवर मृत्यूशी झुंज देत असलेल्या घनशाम पिराजी देवकाते यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करून, आरोपींना पाठीशी घातले जात असल्याचा खळबळजनक आरोप पीडित कुटुंबाने केला आहे. या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन देऊन आरोपींवर भारतीय न्याय संहितेच्या (पूर्वीचे आयपीसी) कलम ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

**जीवघेण्या हल्ल्यानंतरही कलम ३०७ लावण्यास टाळाटाळ,बदनापूर तालुक्यातील काजळा येथील घटना; १५ दिवसांपासून पीडित रुग्णालयात, तरीही पोलिसांची संशयास्पद भूमिका**



मिळालेल्या माहितीनुसार, ११ फेब्रुवारी रोजी घनशाम देवकाते हे आपल्या शेतात काम करत असताना आरोपी श्रीकांत खंडेकर आणि सूरज पांढरे यांनी त्यांच्यावर शस्त्राने जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात देवकाते गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर गेल्या १५ दिवसांपासून रुग्णालयात उपचार सुरू आहेत. इतकी गंभीर घटना घडूनही पोलिसांनी आरोपींवर सौम्य कलमे लावून त्यांना मोकळीक दिल्याने परिसरात संताप व्यक्त होत आहे.

**आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी आणि 'खाकी'चा वरदहस्त?**

देवकाते यांनी पोलीस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात आरोपींच्या गुन्हेगारी कुंडलीचा पाढाच वाचला आहे.

**वाळू माफियाचा दराराः** आरोपी श्रीकांत खंडेकर हा वाळू माफिया असून, अवघ्या वर्षभरात त्याने हायवा, ट्रॅक्टर आणि अलिशान गाड्यांसह बेहिशोबी मालमत्ता जमवल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

**मटका आणि गुंडगिरीः** दुसरा आरोपी सूरज पांढरे हा मटका व्यवसायाशी संबंधित असून, त्याचे जवळचे नातेवाईक पोलीस दलात कार्यरत असल्याने त्याला कोणाचीही भीती नसल्याचा आरोप आहे. विशेष म्हणजे सूरजचे वडील भाऊसाहेब पांढरे हे देखील एका खून प्रकरणातील आरोपी राहिलेले आहेत.

**मुलींची छेडछाडः** या दोन्ही आरोपींनी परिसरात शाळकरी मुलींची छेड काढण्याचे अनेक प्रकार केल्याचेही देवकाते यांनी नमूद केले आहे.

तपास अधिकाऱ्यांची कार्यपद्धती संशयास्पद

पीडित देवकाते यांनी तपास अधिकारी पोलीस हेड कॉन्स्टेबल दासर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.समजपत्राचा ससेमिरा: पीडित जखमी अवस्थेत असताना उलट त्यांनाच **'तपासात सहकार्य करत नाही'** अशी समजपत्रे व्हॉट्सपवर पाठवण्यात आली.

**जामिनासाठी मदतः** आरोपींचे शिक्षण सुरू असल्याचे कारण देऊन त्यांना जामीन मिळवून देण्यासाठी पोलिसांनीच पुढाकार घेतल्याचा संशय व्यक्त होत आहे.

FIR **देण्यास टाळाटाळः** घटनेला इतके दिवस उलटूनही पीडिताला अद्याप एफआयआर (FIR) ची प्रत देण्यात आलेली नाही. तसेच मूळ जबाबात फेरबदल केल्याची शक्यताही देवकाते यांनी वर्तवली आहे.

मी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत असताना आरोपींना जामीन कसा मिळतो? पोलीस आरोपींचे नातेवाईक असल्यासारखे वागत आहेत. आम्हाला अद्याप एफआयआरची प्रत मिळालेली नाही, यावरूनच पोलिसांची मिलीभगत स्पष्ट होते.

**- घनशाम देवकाते (फिर्यादी)**

**कुटुंबाला जीविताचा धोका; आंदोलनाचा इशारा**

आरोपी मोकाट असल्याने आपल्याला आणि आपल्या मुलाच्या जीविताला धोका असल्याचे देवकाते यांनी निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून आरोपींवर कलम ३०७ (हत्येचा प्रयत्न) नुसार गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा पीडित कुटुंबाने दिला आहे.

आता या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षक काय भूमिका घेतात आणि संबंधित वादग्रस्त तपास अधिकाऱ्यावर काय कारवाई होते, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जालना शहरात मोकाट कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी महानगरपालिका ॲक्शन मोडमध्ये



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** शहरात गेल्या काही दिवसांपासून मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट वाढला असून, नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर, जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने आज, दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी शहराच्या विविध भागांत मोकाट कुत्रे पकडण्याची आणि त्यांच्या निर्बीजीकरणाची धडक मोहीम राबविण्यात आली.

महानगरपालिका प्रशासनाने विशेष पथकाद्वारे ही मोहीम हाती घेतली आहे. शहरातील मुख्य चौक, गल्लीबोळ आणि वर्दळीच्या ठिकाणांहून मोकाट कुत्र्यांना शिताफीने पकडण्यात आले. पकडलेल्या कुत्र्यांचे रीतसर निर्बीजीकरण करून त्यांच्यावर आवश्यक लसीकरण करण्यात येणार आहे, जेणेकरून भविष्यात त्यांची संख्या मर्यादित राहील आणि रेबीजसारख्या आजारांचा धोका टळेल.

ही मोहीम सुरू असताना महानगरपालिकेचे पथक कशा प्रकारे जीव धोक्यात घालून आक्रमक कुत्र्यांना जेरबंद करते, याचे प्रत्यक्ष वार्तांकन आणि उत्कृष्ट छायाचित्रण प्रसिद्ध छायाचित्रकार किरण खानापुरे यांनी केले आहे. कुत्र्यांना पकडताना होणारी धावपळ आणि महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे कसब त्यांनी आपल्या कॅमेऱ्यात कैद केले आहे.

लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांवर कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना ताज्या असतानाच महानगरपालिकेने ही कारवाई केल्यामुळे जालनावासीयांनी समाधान व्यक्त केले आहे. ही मोहीम केवळ एक दिवसापुरती मर्यादित न ठेवता सातत्याने राबवावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.नागरिकांनी आपल्या परिसरातील मोकाट कुत्र्यांची माहिती महानगरपालिकेला द्यावी आणि या मोहिमेला सहकार्य करावे, जेणेकरून शहर भयमुक्त होण्यास मदत होईल.

# २७ फेब्रुवारीला जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक; जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत होणार तक्रारींचे निवारण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेच्या महत्त्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक सकाळी ११:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात संपन्न होईल.या बैठकीचे अध्यक्षपद जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल भूषविणार आहेत. बैठकीत प्रामुख्याने जिल्ह्यातील ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या, फसवणुकीचे प्रकार आणि ग्राहक हक्कांची प्रभावी अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे.जिल्हा पुरवठा अधिकारी तथा सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले आहे की, या समितीवर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व शासकीय आणि अशासकीय सदस्यांना या बैठकीसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. बैठकीत होणाऱ्या निर्णयांची तत्काळ अंमलबजावणी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.जालना जिल्ह्यातील सामान्य नागरिकांसाठी ही बैठक एक महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. ग्राहक हिताशी संबंधित कोणत्याही तक्रारी असल्यास नागरिक खालील मार्गांनी आपले गाऱ्हाणे मांडू शकतात. प्रत्यक्ष उपस्थिती: नागरिक बैठकीच्या दिवशी (२७ फेब्रुवारी) जिल्हाधिकारी कार्यालयात स्वतः उपस्थित राहून आपला लेखी अर्ज सादर करू शकतात.

डिजिटल तक्रार निवारण: जे नागरिक प्रत्यक्ष येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी प्रशासनाने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जालना जिल्ह्याच्या अधिकृत संकेतस्थळावर (jalna.nic.in) जाऊन तेथील 'ग्राहक तक्रार पोर्टल' (फॉर्म) माध्यमातून आपली तक्रार नोंदवता येईल. जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्राहकांनी आपल्या समस्यांच्या निवारणासाठी या बैठकीचा आणि उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन पोर्टलचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Mundhe Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (Editor - Sugriv Sopanrao Mundhe) Office Ph. : 0240-2474813